# १२) विवेक (Discrimination)

ह. भ. प. श्री. भागवत नारायण साळुंके

१) या सृष्टीतल्या सर्व प्राणीमात्रांपेक्षा मनुष्य हा सर्वांपेक्षा वेगळा त्याच्या बुद्धिवैशिष्ट्यामुळे ठरतो. सामान्यपणे सर्व प्राणीमात्रात काही गोष्टी समान असतात. जशा की आहार, काय खावे अन् काय खाऊ नये हे सर्व प्राणीमात्रांना समजते.

२) थकल्यानंतर अथवा परिश्रमानंतर सर्वच प्राणी मात्र झोपेत जातात. म्हणजे निद्रा ही सर्वांना समान आहे.

३) भय : मृत्यूची भीती मुंगीपासून ते ब्रह्मदेवापर्यंत सर्वांना समान आहे. मृत्यूच्या कारणांचा ध्वनी जरी कानावर आला तरी भीती वाटते. जसे की 'आला आला कोरोना.' कोरोनाची भीती सगळ्या जगात पसरली होती. ही भीती आपण २०२०-२१ मध्ये अनुभवली आहे.

४) मैथुन : प्रजोत्पादन केव्हा, कसे करावे हे सर्व प्राणीमात्रांना न शिकविताही चांगले कळते.

या चार गोष्टी सर्व प्राणीमात्रात समान जरी असल्या आणि त्या मनुष्यमात्रांत जरी असल्या तरी मनुष्यामध्ये असणारा विवेक हा सर्वांपेक्षा विशेष आहे. तो इतरांच्यामध्ये इतका विकसित झालेला नाही. विवेक म्हणजे काय? हा विवेकी माणसाला नेहमी पडणारा प्रश्न आहे. त्याचा उपयोग काय? विवेकाची व्याप्ती किती आहे? नसला तर काय तोटा होणार आहे? आणि असला तर काय फायदा होणार आहे? असे विविध प्रश्न निर्माण होतात.

विवेक म्हणजे पृथक्करण करणे. दोन संमिश्र गोष्टी वेगवेगळ्या

करणे. दोन गोष्टीतील निवड करणे. निवड केलेल्या गोष्टीचा निर्णय करणे हे सर्व काम मानवी बुद्धीचे आहे. निश्चय करणे, निर्णय करणे, निवड करणे इ. कार्य हे बुद्धीचे आहे.

सामान्यपणे विवेकाचा उपयोग आपल्याला दैनंदिन जीवनात यशस्वी होण्यासाठी करावा लागतो. उदा. - भाजी मंडईमध्ये चांगले - वाईट याची निवड करावी लागते. आणि हे भाजी मंडईमध्ये प्रत्येक स्त्री पुरुष करत असताना आपण पाहतो. चांगले वांगी, बटाटे, मिरची, भेंडी, टोमॅटो इ. ची निवड करून घेण्याचे निश्चित करतो, आणि जे टाकाऊ आहे ते परत टाकून देतो. असाच विवेक कपड्याच्या, चपलांच्या, फळांच्या, चष्म्याच्या, भांड्याच्या इ. दुकानात जाऊन करावाच लागतो. परंतु श्री संत ज्ञानेश्वर महाराज सामान्य विवेकापेक्षा विशेष विवेकाचीच ओळख करून देतात.

विशेष विवेक कशाचे पृथक्करण करायचे असा प्रश्न निर्माण करेल.

या विश्वात प्रत्येक वस्तू बाजारात मिश्रण करूनच विकली जाते. खरं आणि खोट्याचं मिश्रण म्हणजे हे संपूर्ण जग आहे. शुद्ध स्वरूपात असणारी या जगात कोणतीच वस्तू नाही. प्रत्येक वस्तूला खोटेपणाचा कलंक लागलेलाच आहे, मग ती वस्तू, व्यक्ती, भावना की विचार असो. या सर्वांच्या मध्ये खरे खोटे, सार-असार, नित्य अनित्य, योग्य - अयोग्य, सत्य - मिथ्या, चांगले वाईट या सर्वांचे एकत्रीकरण म्हणजे या जगातल्या जड चेतन वस्तू आणि व्यक्ती होत. या सर्वांचे पृथक्करण करण्यासाठी विवेक शक्ती संत सान्निध्यात राहून विकसित करावी लागते.

'**संत तेथे विवेका। असणे किजे।**' ज्या ठिकाणी संत असतात त्या ठिकाणी विवेक असतोच. अशा विवेकाचे व्याप्ती लक्षण श्री संत

ज्ञानेश्वर महाराज सांगतात. विवेक शक्ती विकसित नाही केली तर सगळे जगच आपल्याला फसवायला बसलेले आहे. मनुष्य फसला की कष्टी, दुःखी होतो. मग त्याला विवेकाची आठवण होते.

या विवेकाचे स्वरूप निसर्गाच्या परीक्षणातून श्री संत ज्ञानेश्वर महाराज समजावून सांगतात.

सत्य-असत्याच्या मिश्रणातून असत्य टाकून सत्य स्वीकारता आले पाहिजे. मनुष्य सत्यासहित असत्याचा स्वीकार करतो, कारण विवेक शक्ती नसल्यामुळे. हे संपूर्ण जग अनित्य, क्षणभंगुर, असार आणि मिथ्या आहे, परंतु या विश्वाचे अधिष्ठान सत् स्वरूप; चित स्वरूप आणि आनंद स्वरुप आहे. त्याची ओळख, निर्णय आणि निवड करता आली तर या आभासिक जीवनाने प्रभावित होणार नाही आणि सत्यस्वरूप सत्त्वाच्या निवडीने तो आनंदरूप होईल. जर जगाला सत्य आणि ईश्वराला असत्य समजून भ्रमात्मक जगाच्या पाठीमागे पळत राहून सत् स्वरूप ईश्वराकडे दुर्लक्ष केले तर शेवटी दुःखच पदरात पडते.

**या उपाधिमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत।**
**तें तत्वज्ञ संत। स्वीकारिती।।१२६।।** अ. २

पाणी आणि दूध यांचे मिश्रण करून बगळ्यासमोर ठेवले तर तो दोन्हीही एकत्रित पिईल, त्याची निवड करता येणार नाही. परंतु राजहंस पक्षी मात्र आपल्या चोचीच्या विवेकशक्तीने फक्त दुधाचेच सेवन करतो व पाणी तसेच ठेवून देतो. हा निरक्षीरविवेक राजहंस पक्षामध्ये असतो.

**सलिलीं पय जैसें। एक होऊनी मीनलें असे।**
**परी निवडूनि राजहसें। वेगळे कीजे।।१२७।।** अ. २

**सोनार :** कोणत्याही सोनाराजवळ ग्राहकाकडून आलेला अलंकार

हा शुद्ध स्वरूपात नसतो. सोन्याबरोबर हिणकस धातूही सोन्यात संमिश्र असतो. सोनार शुद्ध सोन्याची परीक्षा सोने अग्नीत टाकून करतो. हिणकस धातू अग्नीत जळून जातो, खाली शुद्ध सोने राहते. हिणकस धातू आणि सोने यातला विवेक सोनारालाच अग्नीच्या सहाय्याने कळतो. म्हणून तो शुद्ध सोने घेतो.

**कीं अग्निमुखें किडाळ। तोडोनियां चोखाळ।**
**निवडिती केवळ। बुद्धिमंत॥१२८॥** अ. २

**नवनीत (लोणी) :** दह्याचे घुसळण रवीच्या माध्यमाने करून वरती येणारे लोणी हे साररूप असते. आणि खाली राहिलेले ताक असार रूप असते. गृहिणी तूप करण्यासाठी लोण्याचीच निवड करेल ताकाची नाही.

**ना तरी जाणिवेच्या आयणी। करितां दधिकडसणी।**
**मग नवनीत निर्वाणी। दिसे जैसे॥१२९॥** अ. २



**भुस बीज :** एकत्र मिसळलेले फलकट किंवा कोंडा आणि धान्य ही वाऱ्यावर धरून उफणल्यावर ज्याप्रमाणे निवड धान्य खाली जागेवरच राहते व ते फलकट उडून जाते असे उफनणाऱ्या व्यक्तीला समजून येते.

**कीं भूस बीज एकवट। उपनितां राहे घनवट।**
**तेथ उडे तें फलकट । जाणो आलें।।१३०।।** अ. २

वरील चारही दृष्टांतामध्ये सांगितलेल्या विवेकाच्या एकत्रीकरणाने विकसित झालेला 'विशेष विवेक' त्याने जगाकडे पाहिले असता या जगाचे सार एक चैतन्य आहे आणि ते चैतन्य 'मी स्वतः आहे.' आणि तेच खरे माझे स्वरूप आहे हे ज्याला समजते त्याला श्री ज्ञानेश्वर महाराज विवेकी, ज्ञानी, तत्त्वज्ञ आणि संत अशा विविध नावाने संबोधतात.

**या उपाधिमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत।**
**ते तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।।** अ. २

**आणि अनात्मवर्गनीर। सांडूनि आत्मरसाचें क्षीर।**
**चरताती जे सविचार। राजहंस।।२९६।।** अ. १५

असत्य जगतातून सत्य स्वरूप चैतन्याची निवड करून ते सच्चिदानंद स्वरूप माझे आहे, असा विवेक करण्याचा जन्मसिद्ध हक्क सर्व मानवमात्राला आहे.

अशा विवेकी आणि ज्ञानी संताना श्री ज्ञानेश्वर महाराज राजहंस किंवा परमहंस अशा नावाने संबोधतात.

विवेक म्हणजे फक्त विचार करणे नव्हे तर आपण जो योग्य विचार केलेला आहे त्यानुसार योग्य कृती करणे होय.